॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 4 --- CHATURTHODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

__Machchindranath__ approaches the fortress shrine of Goddess Hingala, arriving at a massive, mystical gateway guarded by the ferocious __Ashta-Bhairavas__ (Eight Bhairavas). To trap the master, the guards disguise themselves as serene ascetics (sannyaasa-rupaa) and demand to know his spiritual lineage. When Machchindra proclaims the supremacy of the Nath path, the Bhairavas mock his words as worthless heresy and unleash a terrifying army of __one billion Chamundas__ to swallow the yogi alive. Unmoved, Machchindra declares that his entire life belongs to God's cosmic purpose and counters their dark fury using the unshakeable power of the Sabari mantra, single-handedly defeating the entire demonic vanguard.

Astonished that her invincible guardians have been overcome, __Goddess Bhagavati__ manifests in her radiant cosmic form and recognizes Machchindra as the divine incarnation of Kavi Narayan. To test the absolute limits of his mantra power before the gathered gods, she commands him to move a massive mountain using nothing but his spoken words. Machchindra executes the feat effortlessly, freezing and hoisting the peak mid-air. Deeply pleased with his flawless spiritual mastery, the Goddess showers him with divine blessings and arms him with specialized, cosmic weapons before he sets out toward his next destiny at __Bara Malhar__ .

Ovee 1

जयजयाजी करुणानिधे । आगमअगोचर विशाळबुद्धे । सकळमुनिमानस हृदयवृंदे । उद्यान वाटे आनंदाचे ॥ १ ॥

Transliteration

Jaya-jaya-ji karunaa-nidhe | Aagama-agochara vishaala-buddhe | Sakala-muni-maanasa hridayavrinde | Udyaana vaate aanandaa che ||

Ovee 2

हे योगिमानसरजनी । पंढरीशा मूळपीठणी । पुंडलिकाचे आराध्य स्वामिणी । उभी असती विटेवरी ॥ २ ॥

Transliteration

Hey yogi-maanasa-rajanee | Pandhareeshaa moola-peethanee | Pundalikaache aaraadhya svaaminee | Ubhee asasee vitevaree ||

Ovee 3

सौम्य दिससी परी नीटक । बहुत ठक चित्तचालक । भक्तमानसभावहारक । छिनाल सुकृत उरों नेदीं ॥ ३ ॥

Transliteration

Saumya disasee paree neetaku | Bahuta thaka chitta-chaalaku | Bhakta-maanasa-bhaava-haaraku | Chinaala sukrita uro nedee ||

Ovee 4

पहा कैसी बकासमान । नासाग्रभागीं दृष्टी देऊन । कोणी म्हणेल गरीबावाण । चांगुलपण मिरवीतसे ॥ ४ ॥

Transliteration

Pahaa kaisee bakaasamaanu | Naasaagra-bhaagee drishtee deuunu | Konee mhanela gareebaa-vaanu | Chaangula pana miraveetase ||

Ovee 5

परी ही अंतरीची खुण । नरहरि मालू एकचि जाणे । भक्तीविषयीं लंपट वासना । मनामाजी हुटहुटी ॥ ५ ॥

Transliteration

Paree hee antaree chee khunu | Narahari Maaloo ekachi jaane | Bhaktee-vishayee lampata vaasanaa | Manaamaajee hutahutee ||

Ovee 6

सुकर्म हृदया घालूनि हात । युक्तिप्रयुक्ती काढूनि घेत । पुढें पुढें होऊनि कार्यार्थ । आपुले त्या संपादी ॥ ६ ॥

Transliteration

Sukarma hridayaa ghaaluuni haatu | Yukti-prayuktee kaadhuuni ghetu | Pudhe pudhe houuni kaarya arthu | Aapule tyaa sampaadee ||

Ovee 7

पहा दामाजीचें दायधन । गटकन गिळिलें अभिलाषून । कंगालवृत्ती सोंग धरुन । देव महार झाला असे ॥ ७ ॥

Transliteration

Pahaa Daamaajeeche daayadhanu | Gatakana gilile abhilaashuunu | Kangaala-vrittee songa dharunu | Deva mahaara jhaalaa ase ||

Ovee 8

नरहरि सबळ सुवर्णकर्म । तयाच्या विषयीं वरिला काम । भांडावें तों जन्मोजन्म । शिवमौळी राहातसे ॥ ८ ॥

Transliteration

Narahari sabala suvarnakarmu | Tayaa chyaa vishayee varilaa kaamu | Bhaandaave toh janmojanmu | Shiva maulee raahaatase ||

Ovee 9

कुब्जादादुला वांकुडातिकुडा । नाहीं म्हणे तिला झाला पुंडा । वृदां पुरुषही जाडा । स्मशानवस्ती केलीसे ॥ ९ ॥

Transliteration

Kubjaa-daadulaa vaankudaa-tikudaa | Naahee mhane tilaa jhaalaa pundaa | Vridaa purusha hee jaadaa | Smashaana-vastee keleese ||

Ovee 10

ठकवोनि मारिला काळयवन । सोळा सहस्त्र दादुला होऊन । शेवटीं न पावे समाधान । ब्रह्मस्थिती वरिलीसे ॥ १० ॥

Transliteration

Thakavoni maarilaa Kaalayavanu | Solaa sahastra daadulaa houunu | Shevatee na paave samaadhaanu | Brahma sthitee varileese ||

Ovee 11

चक्षुगोचर होत जें जें । तें मागूं शके अति निर्ल्लज्जें । सुदामाचें पृथुक खाजे । कोरडें न म्हणे सहसाही ॥ ११ ॥

Transliteration

Chakshu-gochara hota je je | Tey maagoo shake ati nirllajje | Sudaamaache prithuka khaaje | Korade na mhane sahasaahee ||

Ovee 12

काय वरिला मृत्यु दुकाळानें । द्रौपदीची खाय भाजीपानें । हात वोडवूनि लाजिरवाणें । मिटक्या मारुनि भक्षीतसे ॥ १२ ॥

Transliteration

Kaaya varilaa mrityu dukaalaane | Draupadee chee khaaya bhaajeepaane | Haata vodavuuni laajiravaane | Mitakyaa maaruni bhaksheetase ||

Ovee 13

शबरीचीं बोरें उच्छिष्ट पाहून । न म्हणे भक्षी मन लावून । चोखियाचा पदार्थ गोड पाहून । ऱ्हदासहित सारीतसे ॥ १३ ॥

Transliteration

Shabareechee bore uchchishta paahuunu | Na mhane bhakshee mana laavuunu | Chokhiyaachaa padaartha goda paahuunu | Hrudayasahita saareetase ||

Ovee 14

नामा बाळ ठकवूनि त्वरित । नैवेद्य भक्षित हातोहात । तस्मात् किती दुर्गुणांत । सद्गुणांतें आणावे ॥ १४ ॥

Transliteration

Naamaa baala thakavuuni tvaritu | Naivedya bhakshita haatohaatu | Tasmaatu kitee durgunaantu | Sadgunaante aanaave ||

Ovee 15

असो ऐसे परम ठकणी । येऊनि बैसली ग्रंथश्रेणी । मम चित्तातें समूळ घेऊनि । पायांपासीं ठेवीतसे ॥ १५ ॥

Transliteration

Aso aise parama thakanee | Yeuuni baisalee grantha-shrenee | Mama chittaate samoola gheuuni | Paayaam-paasee theveetase ||

Ovee 16

असो तिचे वरदेंकरुन । श्रोते ऐका आतां कथन । श्रीमच्छिंद्र योगी पूर्ण । हिंगळाकारणीं संचरला ॥ १६ ॥

Transliteration

Aso tiche varaden-karunu | Shrote aikaa aataa kathanu | Shree Machchindra yogee poornu | Hingalaa-kaaranee sancharalaa ||

Ovee 17

मागिल अध्यायीं कथन । मच्छिंद्र मारुतीचे युद्ध होऊन । शेवटीं प्रीति विनटून । हिंगळाख्यस्थाना पावले ॥ १७ ॥

Transliteration

Maagila adhyaayee kathanu | Machchindra Maarutee che yuddha houunu | Shevatee preeti vinatuunu | Hingalaa-aakhya-sthaanaa paavale ||

Ovee 18

ती ज्वाळामुखी भगवती । महाप्रदीप्त आदिशक्ति । तेथें जाऊनि द्वाराप्रती । मच्छिंद्रनाथ पोचलें ॥ १८ ॥

Transliteration

Tee Jvaalaamukhee Bhagavatee | Mahaa-pradeepta Aadhi Shakti | Tethe jaauuni dvaaraa pratee | Machchindra-Naatha pochale ||

Ovee 19

तंव तें द्वार पाहतां क्षितीं । उंच बाहु सार्धशत । औरस चौरस षडशत । विराजलेसें द्वार तें ॥ १९ ॥

Transliteration

Tava tey dvaara paahataa kshitee | Uncha baahu saardhashatu | Aurasa chaurasa shadashatu | Viraajalese dvaara tey ||

Ovee 20

तें द्वारीं प्रचंड । अष्टाभैरव महाधेंड । त्यांनीं नाथपंथ पाहुनि वितंड । चित्तांत कामना उदेली ॥ २० ॥

Transliteration

Tey dvaaree prachandu | Ashta-Bhairava mahaadhendu | Tyaannee Naatha pantha paahuni vitandu | Chitta anta kaamanaa udelee ||

Ovee 21

नागपत्रअश्वत्थठायीं । मच्छिंद्रनाथ हा गोसावी । नेमाचरणीं विद्याप्रवाहीं । प्रसन्न केलें देवातें ॥ २१ ॥

Transliteration

Naaga Patra Ashvattha thaayee | Machchindra-Naatha haa gosaavee | Nemaa charanee vidyaa pravaahee | Prasanna kele devaate ||

Ovee 22

तरी शाबरीविद्याकवित । येणें केलें वरदस्थित । तपीं तें प्रांजळ कायस्थ । केवीं झालें तें पाहूं ॥ २२ ॥

Transliteration

Taree Shaabaree-vidyaa-kavitu | Yene kele varadasthitu | Tapee tey praanjala kaayasthu | Kevee jhaale tey paahoo ||

Ovee 23

ऐसा काम धरुनि पोटीं । युद्धरीतीच्या सुखालोटीं । अष्टही भैरव एकथाटीं । प्रत्यक्ष झालें द्वारातें ॥ २३ ॥

Transliteration

Aisaa kaama dharuni potee | Yuddha reetee chyaa sukhaa lotee | Ashtahee Bhairava ekathaatee | Pratyaksha jhaale dvaaraate ||

Ovee 24

अंगें नेमूनि संन्यासरुपा । देहपंकजा दावूनि तद्रुपा । म्हणती महाराजा योगदीपा । कोठें जासी तें सांग ॥ २४ ॥

Transliteration

Ange nemuuni sannyaasa-rupaa | Dehapankajaa daavuuni tadrupaa | Mhanatee Mahaaraajaa yogadeepaa | Kothe jaasee tey saangu ||

Ovee 25

येरु म्हणे शक्तिदर्शन । घेणें उदेलें अंतःकरण । तरी तुम्ही आहांत संन्यासधाम । तुम्हां जाणें आहे कां ॥ २५ ॥

Transliteration

Yeru mhane shakti darshanu | Ghene udele antakaranu | Taree tumhee aahaanta sannyaasa-dhaamu | Tumhaa jaane aahe kaa ||

Ovee 26

तंव ते म्हणती जोगिया ऐक । आम्ही येथेंचि स्थायिक । भोगवतीकाजा वरदायक । द्वारपाळ म्हणवितों ॥ २६ ॥

Transliteration

Tava tey mhanatee jogiyaa aiku | Aamhee yethenchi sthaayiku | Bhagavatee kaa jaa varadaayaku | Dvaara-paala mhanavito ||

Ovee 27

तरी येथें कामनास्थित । दर्शनार्थ कोणी येत । तरी पापपुण्य पुसोनि त्याप्रत । मार्गापरी योजितसों ॥ २७ ॥

Transliteration

Taree yethe kaamanaa-sthitu | Darshana artha konee yetu | Taree paapa punya pusoni tyaapratu | Maargaaparee yojitaso ||

Ovee 28

अगा पुमांसा प्राणी शब्दरचनें । दिसून येतां चित्तकामनें । त्या प्रसादूनि अंबादर्शनें । सिद्ध करितो महाराजा ॥ २८ ॥

Transliteration

Agaa pumaansaa praanee shabda-rachane | Disuuna yetaa chitta-kaamane | Tyaa prasaaduuni Ambaa darshane | Siddha karito Mahaaraajaa ||

Ovee 29

आणि पापकलह अर्थ धूर्जटी । आमुतें दिसूनी येता दृष्टी । त्यासी मागें परतवूनि राहटी । तो पुरुष दर्शनासी मिरवेना ॥ २९ ॥

Transliteration

Aani paapakalaha artha Dhoorjatee | Aamute disuunee yetaa drishtee | Tyaasee maage paratavuuni raahatee | Toh purusha darshanaasee miravenaa ||

Ovee 30

तस्मात् वागोत्तराचे देठी । प्रसाद मिरवला हो शेवटीं । तरी त्वत्कामना उदेली पोटीं । अंबा दर्शनीं मिरवावें ॥ ३० ॥

Transliteration

Tasmaatu vaag-uttaraache dethee | Prasaada miravalaa ho shevatee | Taree tvatkaamanaa udelee potee | Ambaa darshanee miravaave ||

Ovee 31

तरी महाराजा योगद्रुमा । पापपुण्यांचा झाडा आम्हां । दर्शवोनि दर्शन कामा । स्वस्थ करीं रतिसुखा ॥ ३१ ॥

Transliteration

Taree Mahaaraajaa yogadrumaa | Paapa-punyaanchaa jhaadaa aamhaa | Darshavoni darshana Kaamaa | Svastha karee ratisukhaa ||

Ovee 32

अंतरी आला अर्थकंदर्प । येथें करितां कांही लोप । तरी संचार करितां द्वारमाप । मध्यें अटक महाराजा ॥ ३२ ॥

Transliteration

Antaree aalaa artha-Kandarpu | Yethe karitaa kaanhee lopu | Taree sanchaara karitaa dvaaramaapu | Madhye ataka Mahaaraajaa ||

Ovee 33

द्वार सांकडे होते अतिसान । गुंते करितां अनृत भाषण । मग त्यातें मागें ओढून । पूर्ण शिक्षा दावितों ॥ ३३ ॥

Transliteration

Dvaara saankade hote atisaanu | Gunte karitaa anrita bhaashanu | Maga tyaate maage odhuunu | Poorna shikshaa daavito ||

Ovee 34

तस्मात् तुमची कर्मराहटी । झाली जैसी महींपाठीं । तींतें दर्शवूनि वाग्दिवटीं । दर्शनातें दर्शिजे ॥ ३४ ॥

Transliteration

Tasmaatu tumachee karma-raahatee | Jhaalee jaisee mahee-paathee | Teente darshavuuni vaagdivatee | Darshanaate darshije ||

Ovee 35

येरु म्हणे द्वारस्थ बापा । आम्ही नेणों पुण्यपापा । कर्मसुकर्म अर्थकंदर्पा । ईश्वरी अर्थी केले असे ॥ ३५ ॥

Transliteration

Yeru mhane dvaarastha baapaa | Aamhee neno punyapaapaa | Karmasukarma artha-Kandarpaa | Eeshvaree arthee kele ase ||

Ovee 36

जैसेया लहराभास । उभय नातळे त्या सुखास । हर्ष दरारा सावधपणास । ठायीं ठायीं मुरतसे ॥ ३६ ॥

Transliteration

Jaiseyaa laharaa-bhaasu | Ubhaya naatale tyaa sukhaasu | Harsha daraaraa saavadha-panaasu | Thaayee thaayee muratase ||

Ovee 37

तो नौका सरितातोयी जात । दों थडीं रुख दिसती पळत । दों थडींचा बा एक साक्षिवंत । रुखा पळ नेणेचि ॥ ३७ ॥

Transliteration

Toh naukaa saritaatoyee jaatu | Dho thadee rukha disatee palatu | Dho thadeenchaa baa eka saakshivantu | Rukhaa pala nenechi ||

Ovee 38

कीं तो व्यक्त बहू घटक्षितीं । अंतरदिवटा बहु गभस्ती । परी त्याची सदा दीप्ती । नयनीं मिरवे महाराजा ॥ ३८ ॥

Transliteration

Kee toh vyakta bahoo ghatakshitee | Antara-divataa bahu gabhastee | Paree tyaachee sadaa deeptee | Nayanee mirave Mahaaraajaa ||

Ovee 39

तुटूनि नीतिपुण्यदुमा । आम्ही नेणों पाउली उगमा । तंव ते म्हणती नरेंद्रोत्तमा । बोल बोलसी हे काय ॥ ३९ ॥

Transliteration

Tutuuni neeti punya drumaa | Aamhee neno paaulee ugamaa | Tava tey mhanatee narendra-uttamaa | Bola bolasee hey kaaya ||

Ovee 40

जगीं जन्मोदय देह धरिल्या पोटीं । कर्माकर्म उभे राहटी । मिरवले हे प्रपंचहाटीं । पदार्थसवें हे दोन्ही ॥ ४० ॥

Transliteration

Jagee janmodaya deha dharilyaa potee | Karmaakarma ubhe raahatee | Miravale hey prapancha-haatee | Padaartha-save hey donhee ||

Ovee 41

तरी बा तयाच्या गृहकपाटीं । ना तळपे ना मिरवे शक्ती । तरी आतां लोपूनि कर्माप्रती । अर्थ तुझा सरेना ॥ ४१ ॥

Transliteration

Taree baa tayaa chyaa griha-kapaatee | Naa talape naa mirave shaktee | Taree aataa lopuuni karmaapratee | Artha tujhaa sarenaa ||

Ovee 42

जैसें वेचिल्यावांचूनि धन । ना तळे कदा हाटींचे कण । तरी कर्माकर्म जल्पल्याविण । अर्थ तुझा सरेना ॥ ४२ ॥

Transliteration

Jaise vechilyaa-vaanchuuni dhanu | Naa tale kadaa haateenche kanu | Taree karmaa karma jalpalyaa-vinu | Artha tujhaa sarenaa ||

Ovee 43

तरी प्रांजळवचनप्रवाहीं । कासरिता मिरविल्याही । तेणें दर्शनें अंबापायीं । संगमातें मिरवेल ॥ ४३ ॥

Transliteration

Taree praanjala-vachana-pravaahee | Kaa saritaa miravilyaa-hee | Tene darshane Ambaa paayee | Sangamaate miravela ||

Ovee 44

नातरी गौण धरुनि पोटीं । वदतां अर्थ न लाधे जेठी । प्रांजळ वद कीं शेवटीं । फिरुनि जाशील माघारा ॥ ४४ ॥

Transliteration

Naataree gauna dharuni potee | Vadataa artha na laadhe jethee | Praanjala vada kee shevatee | Phiruni jaasheela maaghaaraa ||

Ovee 45

तुवां प्रांजळ वदल्याविण । करुं न देऊं तुझें गमन । बहुचावटी जल्पल्यान । शिक्षा पावसी येथें तूं ॥ ४५ ॥

Transliteration

Tuvaa praanjala vadalyaavinu | Karu na deoo tujhe gamanu | Bahu-chaavatee jalpalyaanu | Shikshaa paavasee yethe too ||

Ovee 46

ऐसें ऐकतां मच्छिंद्रनाथ । म्हणे शासनीं उदेला आदित्यसुत । तेथें तुमची शक्ति अद्भुत । केवीं वर्णूं मशक हो ॥ ४६ ॥

Transliteration

Aise aikataa Machchindra-Naathu | Mhane shaasanee udelaa Aaditya sutu | Tethe tumachee shakti adbhutu | Kevee varnoo mashaka ho ||

Ovee 47

जो महाप्रलय भद्ररुद्र । जो ग्रासूनि बैसला मुखचंद्र । तेथें तुमची कथा महींद्र । काय असे मशक हो ॥ ४७ ॥

Transliteration

Jo mahaa pralaya Bhadra Rudru | Jo graasuuni baisalaa mukha Chandru | Tethe tumachee kathaa maheendru | Kaaya ase mashaka ho ||

Ovee 48

ऐसी ऐकतां मच्छिंद्रगोष्टी । परम क्रोधाची झाली दाटी । मग ते अष्टभैरव थाटी । एकदांचि उठावले ॥ ४८ ॥

Transliteration

Aisee aikataa Machchindra goshtee | Parama krodha achee jhaalee daatee | Maga tey Ashta-Bhairava thaatee | Ekadaanchi uthaavale ||

Ovee 49

जैसें अपार विधानथाटी । अबळां सांडूनि उबलाकोटी । प्रदीप्त होऊनि सांगे गोष्टी । महाखगीं जाऊनियां ॥ ४९ ॥

Transliteration

Jaise apaara vidhaana-thaatee | Abalaa saanduuni ubalaakotee | Pradeepta houuni saange goshtee | Mahaakhagee jaauuniyaa ||

Ovee 50

तन्न्यायें अष्टभैरव । मांडिते झाले युद्धपर्व । कोणी त्रिशूळ परशु गांडीव । टणत्कारिलें ते समयीं ॥ ५० ॥

Transliteration

Tannyaaye Ashta Bhairavu | Maandite jhaale yuddhaparvu | Konee trishoola parashu gaandeevu | Tanatkaarile tey samayee ||

Ovee 51

तो परजोनि असिलता । मुद्गलगुरु ज्या परमकठिणता । अंकुश बरची मांडू अस्ता । चक्रें चालती उद्देशें ॥ ५१ ॥

Transliteration

Toh parajoni asilataa | Mudgalaguru jyaa parama-kathinataa | Ankusha barachee maandoo astaa | Chakre chaalatee uddeshe ||

Ovee 52

गदा दारुकायंत्र अचाट । भाले गुप्ती कुठार बोथट । ऐशीं शस्त्रें तीव्र अचाट । करीं कवळूनि उठावले ॥ ५२ ॥

Transliteration

Gadaa daaru kaa yantra achaatu | Bhaale guptee kuthaara bothatu | Aishee shastre teevra achaatu | Karee kavaluuni uthaavale ||

Ovee 53

तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । भस्मझोळीं वोपिला हस्त । जय जय श्रीगुरुराजदत्त । म्हणूनि भस्म करीं कवळूनि ॥ ५३ ॥

Transliteration

Tey paahuuni Machchindra-Naathu | Bhasma-jholee vopilaa hastu | Jaya jaya Shreeguru Raaja Dattu | Mhanuuni bhasma karee kavaluuni ||

Ovee 54

दाही दिशा मंत्रगौरव । विभूती चर्चूनि आपुला भाव । म्हणे मित्रावरुणदेव । सिद्ध असोत मम काजा ॥ ५४ ॥

Transliteration

Daahee dishaa mantra gauravu | Vibhootee charchuuni aapulaa bhaavu | Mhane Mitraa Varuna devu | Siddha asota mama kaajaa ||

Ovee 55

अश्विनी वरुण अग्नि वात । धरामरादि वज्रनाथ । गण गंधर्व तरंगिणीवत् । सिद्ध असोत आम्हांतें ॥ ५५ ॥

Transliteration

Ashvinee Varuna Agni Vaatu | Dharaa-mara-aadi Vajra Naathu | Gana gandharva tarangineevatu | Siddha asota aamhaante ||

Ovee 56

बुद्धिसिद्धि योगी अपार । ब्रह्मांडांत नांदणार । त्या सर्वांतें नमस्कार । साह्य असोत आमुतें ॥ ५६ ॥

Transliteration

Buddhi siddhi yogee apaaru | Brahmaanda anta naandanaaru | Tyaa sarvaante namaskaaru | Saahya asota aamute ||

Ovee 57

ऐसी जल्पूनि मंत्रशक्ती । प्रेरिता दृढ झाली विभूती । युद्धसमारंभ क्षितीं । आमंत्रिलें सर्वांसी ॥ ५७ ॥

Transliteration

Aisee jalpuuni mantra shaktee | Preritaa dridha jhaalee vibhootee | Yuddha-samaarambha kshitee | Aamantrile sarvaasee ||

Ovee 58

मग वज्रपंजर प्रयोगभूती । धरास्त्रें नेमूनि शक्रदैवतीं । मंत्रप्रयोग सबळशक्ती । भाळीं विभूती चर्चीतसे ॥ ५८ ॥

Transliteration

Maga vajrapanjara prayoga-bhootee | Dharaastre nemuuni Shakra daiva tee | Mantra prayoga sabala shaktee | Bhaalee vibhootee charcheetase ||

Ovee 59

तेणें शरीर वज्राहून । ते समयीं झाले अतिकठिण । मग म्हणे मच्छिंद्रनाथ पूर्ण । कार्य साधा आपुलें ॥ ५९ ॥

Transliteration

Tene shareera vajraahuunu | Tey samayee jhaale ati kathinu | Maga mhane Machchindra-Naatha poornu | Kaarya saadhaa aapule ||

Ovee 60

यावयातें कराल आळदुजस । तरी मातृपितृशपथेस । गुरु धिक्कारुनि निर्बळ यश । मुखा काळें कराल कीं ॥ ६० ॥

Transliteration

Yaavayaate karaala aaladujasu | Taree maatri-pitri-shapathesu | Guru dhikkaaruni nirbala yashu | Mukhaa kaale karaala kee ||

Ovee 61

मग जिणें संदेहरुपी । मिरविणें येथे मम कंदर्पी । उडी सांडूनि कोरडे कूपीं । प्राण त्यजावा हें बरेंच ॥ ६१ ॥

Transliteration

Maga jine sandeharupee | Miravine yethe mama kandarpee | Udee saanduuni korade koopee | Praana tyajaavaa hey barencha ||

Ovee 62

ऐसी ऐकतां वज्रवाणी । पेटला सबळ जेवीं अग्नी । मग शस्त्रें शिखा नाथविधानीं । कवळूं पाहती ग्रासावया ॥ ६२ ॥

Transliteration

Aisee aikataa Vajra vaanee | Petalaa sabala jevee agnee | Maga shastre shikhaa Naatha-vidhaanee | Kavaloo paahatee graasaavayaa ||

Ovee 63

जे अष्टभैरव भद्रकाळ । शस्त्रें सोडिती उतावेळ । म्हणे येथें यांचा काळ । चिताभस्मीं मेळवा ॥ ६३ ॥

Transliteration

Je Ashta-Bhairava Bhadra kaalu | Shastre soditee utaavelu | Mhane yethe yaanchaa kaalu | Chitaa-bhasmee melavaa ||

Ovee 64

मग नाथशरीरा लक्षूनि अष्ट । शस्त्रें प्रेरिती प्रहार अनिष्ट । त्रिशूळ फरश ते नीट । दणाणीत अंगातें ॥ ६४ ॥

Transliteration

Maga Naatha-shareeraa lakshuuni ashtu | Shastre preritee prahaara anishtu | Trishoola pharasha tey neetu | Danaaneeta angaate ||

Ovee 65

अंकुश परज गूर्ज मुद्गर । मांडू गदा भालचक्र । गुंफी खंजीर बरची असिल । सबळ प्रहारें भेदिती ॥ ६५ ॥

Transliteration

Ankusha paraja goorja mudgaru | Maandoo gadaa bhaala chakru | Gumphee khanjeera barachee asilu | Sabala prahaare bheditee ||

Ovee 66

परी तो शस्त्रें मच्छिंद्रनाथ । तृणप्राय सकळ मानीत । शस्त्रवृष्टी घन वर्षत । मच्छिंद्र पर्वत झालासे ॥ ६६ ॥

Transliteration

Paree toh shastre Machchindra-Naathu | Trinapraaya sakala maaneetu | Shastra vrishtee ghana varshatu | Machchindra parvata jhaalaase ||

Ovee 67

ऐसें होतां ते अवसरीं । निर्विघ्न दिसती ते शस्त्र । मग परम कोपें गांडीवास्त्र । सज्ज करिते पैं झाले ॥ ६७ ॥

Transliteration

Aise hotaa tey avasaree | Nirvighna disatee tey shastru | Maga parama kope Gaandeeva astru | Sajja karite pai jhaale ||

Ovee 68

एकीं निर्मिला वातशर । दुजीं निर्मिला कामास्त्र तीव्र । तिजे निर्मिले वासव अस्त्र । महाशक्ती आगळी ते ॥ ६८ ॥

Transliteration

Ekee nirmilaa vaata sharu | Dujee nirmilaa Kaamaastra teevru | Tije nirmile Vaasava-astru | Mahaa Shaktee aagalee tey ||

Ovee 69

चौथीं योजिले नागास्त्रबंधन । जे महातक्षकाहूनि दारुण । पांचवें ब्रह्मास्त्र प्रवीण । शापादपि विराजे ॥ ६९ ॥

Transliteration

Chauthee yojile Naaga-astra-bandhanu | Je mahaa-Takshakaa-huuni daarunu | Paanchave Brahmaastra praveenu | Shaapaadapi viraaje ||

Ovee 70

सहावें रुद्रास्त्र प्रळयकाळ । कीं भक्षूं पाहे ब्रह्मांड सकळ । सातवें दानवास्त्र सबळ । असंख्य राक्षस मिरवती ॥ ७० ॥

Transliteration

Sahaave Rudraastra pralaya kaalu | Kee bhakshoo paahe Brahmaanda sakalu | Saatave Daanava astra sabalu | Asankhya raakshasa miravatee ||

Ovee 71

आठवें कृतांतास्त्र कठिण । प्रेरितां पावती मृत्यु काळ नाम । प्रचंड हस्तपाश कवळून । असंख्य स्थितीं मिरविती ॥ ७१ ॥

Transliteration

Aathave Kritaanta-astra kathinu | Preritaa paavatee mrityu kaala naamu | Prachanda hasta paasha kavaluunu | Asankhya sthitee miravitee ||

Ovee 72

ऐसे योजूनि शरार्णव । मांडिते झाले प्रळयपर्व । शस्त्रासी मंत्रगौरव । दैवताशक्ती आराधिल्या ॥ ७२ ॥

Transliteration

Aise yojuuni sharaarnavu | Maandite jhaale pralayaparvu | Shastraasee mantra gauravu | Daivataa-shaktee aaraadhilyaa ||

Ovee 73

ऐसे योजूनि गांडीवा गुणी । प्रेरिते झाले अष्टही क्षणीं । मग ते अस्त्र भ्रमतां गगनीं । प्रळयकाळ वोढवला ॥ ७३ ॥

Transliteration

Aise yojuuni Gandeevaa gunee | Prerite jhaale ashtahee kshanee | Maga tey astra bhramataa gaganee | Pralaya kaala vodhavalaa ||

Ovee 74

वातास्त्राची प्रळयगती । महापर्वत स्वर्गपंथी । वायुचक्रीं भ्रमण करिती । अर्की कार्पास जेउता ॥ ७४ ॥

Transliteration

Vaataastra achee pralayagatee | Mahaa parvata svarga panthee | Vaayu-chakree bhramana karitee | Arkee kaarpaasa jeutaa ||

Ovee 75

कामास्त्र परम कठिण । उर्वशीचें चांगुलपण । अन्य दारा करवीत गमन । मच्छिंद्रजती ये कृती ॥ ७५ ॥

Transliteration

Kaamaastra parama kathinu | Urvasheeche chaangula panu | Anya daaraa karaveeta gamanu | Machchindra-jatee ye kritee ||

Ovee 76

त्याही परम सुंदर खाणी । पाहतां काममूर्छनीं । देच दानव मानव ध्यानीं । जपी तपी लागती ॥ ७६ ॥

Transliteration

Tyaahee parama sundara khaanee | Paahataa kaama-moorchanee | Deva daanava maanava dhyaanee | Japee tapee laagatee ||

Ovee 77

वासवशक्ती अतिप्रौढी । तेज प्रवेशतां पडे ब्रह्मांडीं । मित्रता पाहूनि घालणें उडी । उरली नाहीं मागुतीं ॥ ७७ ॥

Transliteration

Vaasava-Shaktee ati praudhee | Teja praveshataa pade Brahmaandee | Mitrataa paahuuni ghaalane udee | Uralee naahee maagutee ||

Ovee 78

ती शक्ती होता प्रगट । शब्द करी कडकडाट । तेणें उचलूं पाहे ब्रह्मांडपीठ । धराकंप दाटला ॥ ७८ ॥

Transliteration

Tee shaktee hotaa pragatu | Shabda karee kadakadaatu | Tene uchaloo paahe Brahmaanda peethu | Dharaakampa daatalaa ||

Ovee 79

शेष दचकला आपुले मनीं । उंचावीतसे ग्रीवा मूर्धनी । कूर्म पृष्टा सरसावूनी । भयें कांपे चळचळां ॥ ७९ ॥

Transliteration

Shesha dachakalaa aapule manee | Unchaaveetase greevaa moordhanee | Koorma prishtaa sarasaavuunee | Bhaye kaampe chalachalaa ||

Ovee 80

वराह उंचावोनि दंत । म्हणे धरा होती रसा व्यक्त । दिग्गज भयभीतचित्त । सैरा धांवती दशदिशां ॥ ८० ॥

Transliteration

Varaaha unchaavoni dantu | Mhane dharaa hotee rasaa vyaktu | Diggaja bhayabheeta chittu | Sairaa dhaavatee dasha dishaa ||

Ovee 81

अस्त्रें नोहे प्रळय अचाट । कीं प्रळयरुद्राचा हळहळाट । विमानयानीं पाहे सुभट । त्या पळतां समजेना ॥ ८१ ॥

Transliteration

Astre nohe pralaya achaatu | Kee pralaya Rudra achaa halahalaatu | Vimaana-yaanee paahe subhatu | Tyaa palataa samajenaa ||

Ovee 82

तेज पाहतां सत्य अद्भुत । गंधर्व झाले मूर्छागत । तार तारांगण होत । चंद्र लपवी मुखातें ॥ ८२ ॥

Transliteration

Teja paahataa satya adbhutu | Gandharva jhaale moorchaagatu | Taara taaraangana hotu | Chandra lapavee mukhaate ||

Ovee 83

सूर्य वरुणा करी दाटी । म्हणे राहें खगापोटीं । वेगीं प्रळय जेठी । जगामाजी मिरवला ॥ ८३ ॥

Transliteration

Soorya Varunaa karee daatee | Mhane raahe khagaapotee | Vegee pralaya jethee | Jagaa-maajee miravalaa ||

Ovee 84

शिव झाला भयातुर । रक्षा कपाटें गिरिकंदर । ऐसा प्रळय होतां अपार । ठायीं ठायीं पडताती ॥ ८४ ॥

Transliteration

Shiva jhaalaa bhayaaturu | Rakshaa kapaate girikandaru | Aisaa pralaya hotaa apaaru | Thaayee thaayee padataa tee ||

Ovee 85

त्यांत नागास्त्र विषवल्लीसरणी । प्रगटतां विषाची प्रेरणी । अघटित तेथें जाहली करणी । आली विषाची मूर्छना ॥ ८५ ॥

Transliteration

Tyaata Naagaastra visha-vallee-saranee | Pragatataa vishaachee preranee | Aghatita tethe jaahalee karanee | Aalee vishaachee moorchanaa ||

Ovee 86

होतां जलशापादिक । त्यांत प्रवेशला रुद्रास्त्र पावक । तो क्षणें जाळूं पाहें सकळिक । ग्रासीन म्हणे ब्रह्मांड ॥ ८६ ॥

Transliteration

Hotaa Brahma shaapa aadiku | Tyaata praveshalaa Rudraastra paavaku | Toh kshane jaaloo paahe sakaliku | Graaseena mhane Brahmaanda ||

Ovee 87

त्यातें साह्यार्थ दानवास्त्र झालें । भयानक बहुधा रक्षक धांवले । तैशांत काळास्त्र परम शिरलें । प्राण हरुं लोकांचा ॥ ८७ ॥

Transliteration

Tyaate saahya artha Daanava astra jhaale | Bhayaanaka bahudhaa rakshaka dhaavale | Tai shaanta Kaalaastra parama shirale | Praana haru lokaanchaa ||

Ovee 88

ऐसी प्रळयाची होतां मांडणी । मच्छिंद्र देखतां नयनीं । मग नव अस्त्रशक्तिमंत्र जपूनी । विभूतीतें सोडीतसे ॥ ८८ ॥

Transliteration

Aisee pralaya achee hotaa maandanee | Machchindra dekhataa nayanee | Maga nava astra shakti mantra japuunee | Vibhooteete sodeetase ||

Ovee 89

तेणें अस्त्रविचक्षणीं । कैसे ऐका प्रतापखाणी । वातअस्त्राचे पुढे जाऊनी । पर्वतास्त्र विराजलें ॥ ८९ ॥

Transliteration

Tene astra-vichakshanee | Kaise aikaa prataapa khaanee | Vaata astraa che pudhe jaauunee | Parvata astra viraajale ||

Ovee 90

यावरी कामास्त्रापुढें जाऊनी । संचरले अस्त्र विरक्त धडपडूनी । तेणें कामास्त्र बापुडें होऊनी । पाठी देऊनि पळतसे ॥ ९० ॥

Transliteration

Yaavaree Kaama astraa pudhe jaauunee | Sancharale astra virakta dhadapaduunee | Tene Kaamaastra baapude houunee | Paathee deuuni palatase ||

Ovee 91

वासवशक्ति अतिदारुण । तियेचें पुढें झाले मोहन । तेणें महंता गेली पळून । वासवशक्तीची सर्वस्वें ॥ ९१ ॥

Transliteration

Vaasava-shakti ati daarunu | Tiyeche pudhe jhaale mohanu | Tene mahantaa gelee paluunu | Vaasava-shakteecee sarvasve ||

Ovee 92

नागास्त्राचे पडिपाडीं । खगेंदास्त्र घाली उडी । सकळ नागाची जुपडी । दाढेखाली रगडी तें ॥ ९२ ॥

Transliteration

Naaga astraa che padipaadee | Khagendra-astra ghaalee udee | Sakala naaga achee jupadee | Daadhe-khaalee ragadee tey ||

Ovee 93

यावरी ब्रह्मास्त्र प्रळयानळ । यास्तव अस्त्र उरों नेदी केवळ । शांति वरुण वाचे सफळ । आशीर्वचन नाथातें ॥ ९३ ॥

Transliteration

Yaavaree Brahmaastra pralayaanalu | Yaastava astra uro nedee kevalu | Shaanti Varuna vaache saphalu | Aasheervachana naathaate ||

Ovee 94

यावरी रुद्रास्त्र उरों नेदी केवळ । तयापुढें धाडिलें कार्तिकेयास्त्र बाळ । येतांचि सर्व अंग झाले शीतळ । कोप शांताब्धींत बुडाला ॥ ९४ ॥

Transliteration

Yaavaree Rudraastra uro nedee kevalu | Tayaa pudhe dhaadile Kaartikeya astra baalu | Yetaanchi sarva anga jhaale sheetalu | Kopa shaanta-abdheenta budaalaa ||

Ovee 95

दानवास्त्रा नाहीं मिती । त्याची मच्छिंद्राचें देवास्त्र करी शांती । सकळ त्यातें पाहूनि जाती । अंतरिक्षस्थानीं आपुल्या ॥ ९५ ॥

Transliteration

Daanava astraa naahee mitee | Tyaachee Machchindraache devaastra karee shaantee | Sakala tyaate paahuuni jaatee | Antariksha sthaanee aapulyaa ||

Ovee 96

यावरी काळास्त्र गहन । तेणे संजीवनी अस्त्र पुढें पाहून । मागोमागें पाश घेऊन । निर्लज्जपणें पळताती ॥ ९६ ॥

Transliteration

Yaavaree Kaalaastra gahanu | Tene Sanjeevanee astra pudhe paahuunu | Maagomaage paasha gheuunu | Nirlajjapane palataa tee ||

Ovee 97

ऐशी अष्टांची अष्टनिवृत्ती । करुनि पावली सकळ शांति । यावरी जें अस्त्र उरलें नववे मिती । तयाची ख्याती परिसावी ॥ ९७ ॥

Transliteration

Aishee ashtaanchee ashta-nivrittee | Karuni paavalee sakala shaanti | Yaavaree je astra urale navave mitee | Tayaachee khyaatee parisaavee ||

Ovee 98

तें वातास्त्र अर्कप्रचंड । प्रवेश करितां भैरवपिंड । तेणें विकळ झालें अष्टधेंड । चलनवलन विसरले ॥ ९८ ॥

Transliteration

Tey Vaataastra arka-prachandu | Pravesha karitaa Bhairava-pindu | Tene vikala jhaale ashtadhendu | Chalana-valana visarale ||

Ovee 99

प्रथम वासव शक्ति प्रगट होतां । दणाणा उठला ब्रह्मांडीं समस्तां । तो प्रळयनाद अंबा ऐकता । परिचारिका धाडीतसे ॥ ९९ ॥

Transliteration

Prathama Vaasava-shakti pragata hotaa | Danaanaa uthalaa Brahmaandee samastaa | Toh pralaya naada Ambaa aikataa | Parichaarikaa dhaadeetase ||

Ovee 100

त्या परिचारिका एकएकाकिनी । कोटी चामुंडा लावण्यखाणी । शंखिनी डंखिनी योगिनी । जळदेवता पातल्या ॥ १०० ॥

Transliteration

Tyaa parichaarikaa ekaekaakinee | Kotee Chaamundaa laavanya khaanee | Shankhinee Dankhinee Yoginee | Jala devataa paatalyaa ||

Ovee 101

चंडा रंडा मुंडा कुंडा । मंडा वंडा आणि वितंडा । ऐशा वर्णिल्या किती तोंडा । अष्टराष्ट्री धांविन्नला ॥ १०१ ॥

Transliteration

Chandaa Randaa Mundaa Kundaa | Mandaa Vandaa aani Vitandaa | Aishaa varnilyaa kitee tondaa | Ashta-raashtree dhaavinnalaa ||

Ovee 102

परी पूर्वी पांचसाती । समाचारा आल्या असती । त्यांनीं पाहुनि प्रळयगती । सकळ समुदाय तो आणिला ॥ १०२ ॥

Transliteration

Paree poorvee paancha-saatee | Samaachaaraa aalyaa asatee | Tyaannee paahuni pralayagatee | Sakala samudaaya toh aanilaa ||

Ovee 103

त्याही चामुंडा तीव्र थोर । शस्त्रास्त्रीं करिती मार । परी तो सुभट मच्छिंद्र । निवारीत अस्त्राने ॥ १०३ ॥

Transliteration

Tyaahee Chaamundaa teevra thoru | Shastra astree karitee maaru | Paree toh subhata Machchindru | Nivaareeta astraane ||

Ovee 104

असो वातास्त्रआकर्षणीं । अष्टभैरव गेले क्षीण होऊनी । प्राण विकळ देह धरणीं । निचेष्टित पडियेले ॥ १०४ ॥

Transliteration

Aso Vaata-astra-aakarshanee | Ashta-Bhairava gele ksheena houunee | Praana vikala deha dharanee | Nicheshtita padiyele ||

Ovee 105

यावरी एक क्षणीं चामुंडाभार । तयांचा कैसा झाला विचार । भुलीक मोहनास्त्र । कामशरीं योजिलें ॥ १०५ ॥

Transliteration

Yaavaree eka kshanee Chaamundaa-bhaaru | Tayaanchaa kaisaa jhaalaa vichaaru | Bhuleeka mohanaastru | Kaamasharee yojile ||

Ovee 106

तंव तें अस्त्र प्राबल्यवंत । सर्वांच्या संचरले देहीं गुप्त । तेंणें क्षणैक होऊन मूर्छित । पिशाचासमान भ्रमताती ॥ १०६ ॥

Transliteration

Tava tey astra praabalya-vantu | Sarvaanchyaa sancharale dehee guptu | Tenne kshanaika houuna moorchitu | Pishaachaa-samaana bhramataatee ||

Ovee 107

कोणी वाद्यें घेऊनि नाचती । कोणी उगीच टाळ्या पिटिती । कोणी खगीं तंद्री लाविती । कोणी हंसती गदगदां ॥ १०७ ॥

Transliteration

Konee vaadye gheuuni naachatee | Konee ugeecha taalyaa pititee | Konee khagee tandree laavitee | Konee hansatee gadagadaa ||

Ovee 108

कोणी म्हणती विमान आलें । कोणी उभ्याच डोलती डोले । कोणी धांवती महीं पाउलें । पळतां उलथोनि पडताती ॥ १०८ ॥

Transliteration

Konee mhanatee vimaana aale | Konee ubhyaacha dolatee dole | Konee dhaavatee mahee paaule | Palataa ulathoni padataa tee ||

Ovee 109

कोणी उगेचि स्फुंदोनि रडती । कोणी गोंधळी गायन करिती । कोणी रानोरान भ्रमती । आई बया म्हणोनि ॥ १०९ ॥

Transliteration

Konee ugechi sphundoni radatee | Konee gondhalee gaayana karitee | Konee raanoraana bhramatee | Aaee bayaa mhanoni ||

Ovee 110

कोणी लोळती धुळींत । कोणी मृत्तिका उधळीत । कोणी उदो उदो म्हणत । कोणी रडतां पडताती ॥ ११० ॥

Transliteration

Konee lolatee dhuleentu | Konee mrittikaa udhaleetu | Konee udo udo mhanatu | Konee radataa padataa tee ||

Ovee 111

कोणी निचेष्टित पडतां धरणीं । मक्षिका गोंगाट करिती वदनी । कोणी उग्याच शिव्या देऊनी । विवाद करिताती नेपुरें ॥ १११ ॥

Transliteration

Konee nicheshtita padataa dharanee | Makshikaa gongaata karitee vadanee | Konee ugyaacha shivyaa deuunee | Vivaada karitaa tee nepure ||

Ovee 112

कोणी भेटती दाटती प्रेमे । कोणी काष्ठांचे उभवूनी सप्रेमें । नाना खेळ स्त्रिया उगमें । पुरुषनांवीं होताती ॥ ११२ ॥

Transliteration

Konee bhetatee daatatee preme | Konee kaashthaanche ubhavuunee sapreme | Naanaa khela striyaa ugame | Purusha-naavee hotaatee ||

Ovee 113

कोणी फेडूनि नेसतें वसन । वृक्षा नेसविती गुंडाळून । कोणी कवळूनि करीं पाषाण । स्तनपान करिती त्या ॥ ११३ ॥

Transliteration

Konee pheduuni nesate vasanu | Vrikshaa nesavitee gundaaluunu | Konee kavaluuni karee paashaanu | Stanapaana karitee tyaa ||

Ovee 114

कोणी काढूनि चोळी चिंधोटी । त्याची नेसती लंगोटी । अंगा चर्चूनि भस्मचिमुटी । भोपळा नरोटी कवळूनियां ॥ ११४ ॥

Transliteration

Konee kaadhuuni cholee chindhotee | Tyaachee nesatee langotee | Angaa charchuuni bhasma-chimutee | Bhopalaa narotee kavaluuni yaa ||

Ovee 115

कोणी ऊर्ध्व करोनि हस्त । अलख म्हणोनि भिक्षा मागत । कोणी शृंगार काढूनि निश्चित । पाषाणांतें लेवविलें ॥ ११५ ॥

Transliteration

Konee oordhva karoni hastu | Alakha mhanoni bhikshaa maagatu | Konee shringaara kaadhuuni nishchitu | Paashaanaante levavile ||

Ovee 116

ऐसा होता चमत्कार । त्यांत काय करी नाथ मच्छिंद्र । विद्यागौरवी प्रहर । तयामाजी संचरवीं ॥ ११६ ॥

Transliteration

Aisaa hotaa chamatkaaru | Tyaata kaaya karee Naatha Machchindru | Vidyaa-gauravee praharu | Tayaa maajee sancharavee ||

Ovee 117

तें अस्त्र चपळ सबळवंत । वसनें आसडूनि त्वरित । नेऊनियां गगनपंथे । अंबरातें मिरविलीं ॥ ११७ ॥

Transliteration

Tey astra chapala sabala vantu | Vasane aasaduuni tvaritu | Neuuniyaa gagana-panthe | Ambaraate miravilee ||

Ovee 118

मग त्या सकळ नग्न होऊनी । नृत्य करिती सकळ अवनीं । त्याही सकळ आणि मच्छिंद्रमुनी । मायास्त्रातें जल्पतसे ॥ ११८ ॥

Transliteration

Maga tyaa sakala nagna houunee | Nritya karitee sakala avanee | Tyaahee sakala aani Machchindra-munee | Maaya astraate jalpatase ||

Ovee 119

तेणेंकरुनि अपार पुरुष । सर्वभूषणीं महादक्ष । निर्मूनियां नाथ प्रत्यक्ष । समोर संचार करवीतसे ॥ ११९ ॥

Transliteration

Tenenkaruni apaara purushu | Sarva bhooshanee mahaa dakshu | Nirmuuni yaa Naatha pratyakshu | Samora sanchaara karaveetase ||

Ovee 120

ऐसी करुनि दृढ राहटी । स्मरणास्त्र जल्पलें होटीं । तेणेंकरुनि सर्व गोरटी । देहाप्रती पातल्या ॥ १२० ॥

Transliteration

Aisee karuni dridha raahatee | Smarana astra jalpale hotee | Tenenkaruni sarva goratee | Dehaapratee paatalyaa ||

Ovee 121

देहस्मरणीं होतां स्थित । आपण आपणाकडे पहात । तो नग्नशरीरी केश मुक्त । परम लज्जित मग त्या झाल्या ॥ १२१ ॥

Transliteration

Deha smaranee hotaa sthitu | Aapana aapanaakade pahaatu | Toh nagna-shareeree kesha muktu | Parama lajjita maga tyaa jhaalyaa ||

Ovee 122

भोवतें पाहती दृष्टी करुनी । तों अपार पुरुष देखिले नयनीं । तेणें फारच लज्जित होऊनी । पळती सैराट नग्नचि ॥ १२२ ॥

Transliteration

Bhovate paahatee drishtee karunee | Toh apaara purusha dekhile nayanee | Tene phaaracha lajjita houunee | Palatee sairaata nagnachi ||

Ovee 123

तों पळतपळत सहज नयनीं । भैरव पाहिले अनवस्थान । कंठी उरलासे प्राण । रुधिर अवनीं सांडतसे ॥ १२३ ॥

Transliteration

Toh palata palata sahaja nayanee | Bhairava paahile anavasthaanu | Kanthee uralaase praanu | Rudhira avanee saandatase ||

Ovee 124

आणिक पाहिलें नेत्रश्वेतीं । मग पळूनि गेल्या जेथें भगवती । अंबिका पाहूनि नग्न समस्ती । आश्चर्य चित्तीं करीतसे ॥ १२४ ॥

Transliteration

Aanika paahile netra Shvetee | Maga paluuni gelyaa jethe bhagavatee | Ambikaa paahuuni nagna samastee | Aashcharya chittee kareetase ||

Ovee 125

म्हणे कां वो ऐसे केलें । कोणी तुम्हांतें नागविलें । येरी म्हणती सुकृत संपले । म्हणूनि अवस्था हे झाली ॥ १२५ ॥

Transliteration

Mhane kaa vo aise kele | Konee tumhaante naagavile | Yeree mhanatee sukrita sampale | Mhanuuni avasthaa hey jhaalee ||

Ovee 126

माय वो माय जोगी आला । कोणीकडोनि जाणों आम्ही त्याला । तेणे करुनि अवस्था आम्हांला । प्राण घेतला भैरवांचा ॥ १२६ ॥

Transliteration

Maaya vo Maaya jogee aalaa | Koneekadoni jaano aamhee tyaalaa | Tene karuni avasthaa aamhaalaa | Praana ghetalaa Bhairavaanchaa ||

Ovee 127

आतां जननी काय उरलें । तुम्ही स्वस्थान सोडा वहिलें । नातरी दशा पूर्ण पावाल । आम्हां दिसतें जननीये ॥ १२७ ॥

Transliteration

Aataa jananee kaaya urale | Tumhee sva sthaana sodaa vahile | Naataree dashaa poorna paavaalu | Aamhaa disate jananeeye ||

Ovee 128

भैरवांसारिखे वीर धुरंधर । तयांचा प्राण कंठावर । उरला असे बरावा विचार । आम्हांलागीं दिसेना ॥ १२८ ॥

Transliteration

Bhairavaan-saarikhe veera dhurandharu | Tayaanchaa praana kanthaa varu |
Uralaa ase baraavaa vichaaru | Aamhaa laagee disenaa ||

Ovee 129

तो जोगी नव्हे मायाजननी । सुप्त प्रसवला दुसरा तरणी । पूर्वभयाची आतां मांडणी । जगामाजी मिरवेना ॥ १२९ ॥

Transliteration

Toh jogee navhe maayaa jananee | Supta prasavalaa dusaraa taranee | Poorva-bhayaachee aataa maandanee | Jagaa-maajee miravenaa ||

Ovee 130

की एकादश प्रळयरुद्र । एकच शरीरीं मिरवले भद्र । देवदानव नक्षत्र चंद्र । आम्हां वाटलें ग्रासितो ॥ १३० ॥

Transliteration

Kee ekaadasha pralaya Rudru | Ekacha shareeree miravale Bhadru | Deva daanava nakshatra Chandru | Aamhaa vaatale graasito ||

Ovee 131

कीं माये प्रळयविजेच्या स्थानास । आजीच आली धरुनि यास । आप तेज मही वायु आकाश । ग्रासील ऐसें वाटतसे ॥ १३१ ॥

Transliteration

Kee maaye pralaya-vijechyaa sthaan aasu | Aajeecha aalee dharuni yaasu | Aapa teja mahee vaayu aakaashu | Graaseela aise vaatatase ||

Ovee 132

तरी आतां वेगीं माये । या स्थानातें आंचवावे । कोणे प्रकारें वांचवावें । जीवित्व आपुलें जननीये ॥ १३२ ॥

Transliteration

Taree aataa vegee maaye | Yaa sthaanaate aanchavaave | Kone prakaare vaanchavaave | Jeevitva aapule jananeeye ||

Ovee 133

ऐसें बोलूनी भयभीत । कंपायमान बावऱ्या होत । कोणी बोलतां चांचरा घेत । आला आला म्हणोनि ॥ १३३ ॥

Transliteration

Aise boluunee bhayabheetu | Kampaayamaana baavaryaa hotu | Konee bolataa chaancharaa ghetu | Aalaa aalaa mhanoni ||

Ovee 134

ऐसी दीक्षामाय भवानी । पाहूनि आश्चर्य करी मनीं । मग स्वचित्तांत पाहे शोधूनी । कोण कोणाचा कोणता ॥ १३४ ॥

Transliteration

Aisee deekshaa Maaya Bhavaanee | Paahuuni aashcharya karee manee | Maga sva chitta anta paahe shodhuunee | Kona konaachaa konataa ||

Ovee 135

तंव तो महाराज कविनारायण । उपरिचर वसूच प्रियनंदन । मच्छिंद्रनामें अवतार धरुन । जगामाजीं मिरवला ॥ १३५ ॥

Transliteration

Tava toh Mahaaraaja Kavi Naaraayanu | Uparichara Vasoocha priyanandanu | Machchindra naame avataara dharunu | Jagaa-maajee miravalaa ||

Ovee 136

ऐसें आणूनी स्वचित्तांत । मग सकळांलागी वसनें देत । पुढें घालूनि अबला समस्त । बाहेर आली जगत्त्रयजननी ॥ १३६ ॥

Transliteration

Aise aanuunee sva chittaantu | Maga sakalaa laagee vasane detu | Pudhe ghaaluuni abalaa samastu | Baahera aalee jagat-traya-jananee ||

Ovee 137

मग मच्छिंद्रापाशीं येऊनि त्वरित । बहु प्रेमानें हृदयीं धरीत । तेंणें पाहूनि जगन्मातेते । चरणावरी लोटला ॥ १३७ ॥

Transliteration

Maga Machchindraa-paashee yeuuni tvaritu | Bahu premaane hridayee dhareetu | Tenne paahuuni jaganmaatete | Charanaa-varee lotalaa ||

Ovee 138

मग घेऊनि अंकी मच्छिंद्रनाथ । म्हणे बा प्रताप केला बहुत । तरी भैरव प्राणरहित । झाले सावध करीं त्यांसी ॥ १३८ ॥

Transliteration

Maga gheuuni ankee Machchindra-Naathu | Mhane baa prataapa kelaa bahutu | Taree Bhairava praana rahitu | Jhaale saavadha karee tyaansee ||

Ovee 139

ऐसें ऐकोनि अंबिका वाणी । प्रसन्न झाली चित्तभवानी । मग अस्त्रविद्या वाताकर्षणीं । काढुनि घेतली ते समयीं ॥ १३९ ॥

Transliteration

Aise aikoni Ambikaa vaanee | Prasanna jhaalee chitta-Bhavaanee | Maga astravidyaa vaataa-karshanee | Kaadhuni ghetalee tey samayee ||

Ovee 140

जैसे दुग्धामाजी तोय । काढुनि घेत हंस समयीं । तेवीं वाताकर्षण अस्त्र सदयी । काढूनि घेत तो नाथ ॥ १४० ॥

Transliteration

Jaise dugdhaa-maajee toyu | Kaadhuni gheta hansa samayee | Tevee vaataa-karshana astra sadayee | Kaadhuuni ghetuli tikshani (gheta toh Naatha) ||

Ovee 141

कीं पंचाक्षरी कौशलेप्रती । मही मांदुसे काढूनि घेती । तन्न्यायें विद्याशक्ती । काढूनि घेत तो नाथ ॥ १४१ ॥

Transliteration

Kee pancha-aksharee kaushale-pratee | Mahee maanduse kaadhuuni ghetee | Tannyaaye vidyaa shaktee | Kaadhuuni gheta toh Naathu ||

Ovee 142

किंवा स्वबुद्धिविचक्षण । कार्य असतां परस्वाधीन । तें युक्तिप्रयुक्तीं घेती करुन । प्राज्ञ बळें आपुलालें ॥ १४२ ॥

Transliteration

Kivaa sva-buddhi-vichakshanu | Kaarya asataa para-svaadheenu | Tey yukti-prayuktee ghetee karunu | Praajnya bale aapulaale ||

Ovee 143

असो ऐसे दृष्टांत बोलें । येरीकडे भैरव सावध झाले । चलनवलन सर्व संचरलें । जैसे तैसें शरीर ॥ १४३ ॥

Transliteration

Aso aise drishtaanta bole | Yereekade Bhairava saavadha jhaale | Chalana-valana sarva sancharale | Jaise taise shareeru ||

Ovee 144

मग झाल्या विचक्षणीं । दिशा पाहती दृष्टीकरुनी । तों जगन्माता अंकी घेऊनि । मच्छिंद्रातें बैसली ॥ १४४ ॥

Transliteration

Maga jhaalyaa vichakshanee | Dishaa paahatee drishtee karunee | Toh jaganmaataa ankee gheuuni | Machchindraate baisalee ||

Ovee 145

मग ते अष्ट भैरव वीर । येते झाले अंबिकेसमोर । म्हणती अंबे प्रताप थोर । मच्छिंद्रानें पै केला ॥ १४५ ॥

Transliteration

Maga tey Ashta-Bhairava veeru | Yete jhaale Ambikesamoru | Mhanatee Ambe prataapa thoru | Machchindraane pai kelaa ||

Ovee 146

आम्ही याची युद्धमांडणी । घेऊं सकळ परीक्षाकडसणी । मग नागपत्रअश्वत्थाहुनी । कथा वदले अंबेतें ॥ १४६ ॥

Transliteration

Aamhee yaachee yuddha-maandanee | Gheoo sakala pareekshaa-kadasanee | Maga Naaga-Patra-Ashvatthaa-hunee | Kathaa vadale Ambete ||

Ovee 147

नागअश्वत्थाहूनि ऐकतां गोष्टी । माता म्हणे हा धन्य धूर्जटी । मग मच्छिंद्रास म्हणे माझे दृष्टीं । प्रताप कांही दावीं कां ॥ १४७ ॥

Transliteration

Naaga-Ashvatthaa-huuni aikataa goshtee | Maataa mhane haa dhanya Dhoorjatee | Maga Machchindraasa mhane maajhe drishtee | Prataapa kaanhee daavee kaa ||

Ovee 148

जैसे पयामाजी तोय । शोषूनि घेत हंस पय । तेवीं आतां युद्धसंदेह । काढूनि दावीं चक्षूतें ॥ १४८ ॥

Transliteration

Jaise payaamaajee toyu | Shoshuuni gheta hansa payu | Tevee aataa yuddha-sandehu | Kaadhuuni daavee chakshoote ||

Ovee 149

यावरी बोले मच्छिंद्रनाथ । कैसी दावूं कोणत्या अर्थ । माता म्हणे हा पर्वत । आकाशातें मिरवीं कीं ॥ १४९ ॥

Transliteration

Yaavaree bole Machchindra-Naathu | Kaisee daavoo konatyaa arthu | Maataa mhane haa parvatu | Aakaashaate miravee kee ||

Ovee 150

मिरवेल परी जेथील तेथ । पुन्हां ठेवी मूर्तिमंत । ऐसें ऐकतां मच्छिंद्रनाथ । करीं कवळी भस्मातें ॥ १५० ॥

Transliteration

Miravela paree jetheela tethu | Punhaa thevee moortimantu | Aise aikataa Machchindra-Naathu | Karee kavalee bhasmaate ||

Ovee 151

मग वायुअस्त्र फणिदैवत । मंत्रजल्पें केले युक्त । पर्वतीं फेकितां भस्म होत । उदयवातचि जो झाला ॥ १५१ ॥

Transliteration

Maga vaayu astra phanidaivatu | Mantrajalpe kele yuktu | Parvatee phekitaa bhasma hotu | Udaya-vaatachi jo jhaalaa ||

Ovee 152

यात मौळीं कद्रुनंदन । पर्वत मौळी शीघ्र वाहून । वातचक्रीं करी भ्रमण । चंडरथासमान कीं ॥ १५२ ॥

Transliteration

Yaata maulee Kadrunandanu | Parvata maulee sheeghra vaahuunu | Vaata chakree karee bhramanu | Chandra-rathaa-samaana kee ||

Ovee 153

त्यातें उलधावया शक्ती । अंबा पाहे आपुल्या चित्तीं । परी शेषमौळींची पर्वतमाती । दृढ असे ढळेना ॥ १५३ ॥

Transliteration

Tyaate uladhaavayaa shaktee | Ambaa paahe aapulyaa chittee | Paree Shesha-mauleenchee parvata-maatee | Dridha ase dhalenaa ||

Ovee 154

मग मनीं म्हणे हा धन्य नाथ । जेणे ऐक्य केला पर्वत वात । शत्रु समरीं ऐक्य चित्त । मिरविलाही हें धन्य ॥ १५४ ॥

Transliteration

Maga manee mhane haa dhanya Naathu | Jene aikya kelaa parvata vaatu | Shatru samaree aikya chittu | Miravilaa hee hey dhanya ||

Ovee 155

पर्वत पूर्ण वातावरी । तो वात मिरवी घेऊनि शिरीं । जैसा मत्स्यकोदरीं । येवोनिया दडाला ॥ १५५ ॥

Transliteration

Parvata poorna vaataa varee | Toh vaata miravee gheuuni shiree | Jaisaa matsya-kodaree | Yevoniyaa dadaalaa ||

Ovee 156

कीं व्याघ्रअजानांदवटी । नांदविले एका पेटीं । कीं उरग उरगारी सांगती गोष्टी । प्रेमभावें मिरवूनियां ॥ १५६ ॥

Transliteration

Kee vyaaghra-jaanaanda-vatee | Naandavile ekaa petee | Kee uraga uragaaree saangatee goshtee | Prema bhaave miravuuniyaa ||

Ovee 157

तन्न्याये मच्छिंद्रें केले । धन्य सद्विद्येचें धाम रचिलें । मग कुरवाळूनि म्हणे वहिलें । पर्वतातें उतरी कां ॥ १५७ ॥

Transliteration

Tannyaaye Machchindre kele | Dhanya sad vidyeche dhaama rachile | Maga kuravaaluuni mhane vahile | Parvataate utaree kaa ||

Ovee 158

मग मच्छिंद्रे वात आकर्षून । ठायींच्या ठायीं नग उतरुन । ठेवूनि अंबेचे समाधान । सद्विद्येनें पैं केलें ॥ १५८ ॥

Transliteration

Maga Machchindre vaata aakarshuunu | Thaayeenchyaa thaayee naga utarunu | Thevuuni Ambeche samaadhaanu | Sadvidyene pai kele ||

Ovee 159

यावरी नाथ आणि भगवती । गेले अंबिकास्थानाप्रती । तेथें राहूनि तीन रात्री । पुसूनियां चालिले ॥ १५९ ॥

Transliteration

Yaavaree Naatha aani bhagavatee | Gele Ambikaa-sthaanaa-pratee | Tethe raahuuni teena raatree | Pusuuniyaa chaatile ||

Ovee 160

मग अंबा प्रसन्न होऊन । अस्त्रे दिधलीं त्यातें दोन । स्पर्शास्त्र अस्त्र भिन्न । प्रसादातें निवेदिलें ॥ १६० ॥

Transliteration

Maga Ambaa prasanna houunu | Astre didhalee tyaate donu | Sparsha astra astra bhinnu | Prasaadaate nivedile ||

Ovee 161

असो ऐसा प्रसाद घेऊन । निघता झाला मातेसी नमून । बारामल्हारांचा मार्ग धरुन । जाता झाला तो नाथ ॥ १६१ ॥

Transliteration

Aso aisaa prasaada gheuunu | Nighataa jhaalaa maatesee namuunu | Baaraamalhaaraanchaa maarga dharunu | Jaataa jhaalaa toh Naatha ||

Ovee 162

पुढें बारामल्हारांचें कथन । श्रोतियां सांगे धुंडीनंदन । नरहरि मालू नामाभिधान । जगामाजीं मिरवे तो ॥ १६२ ॥

Transliteration

Pudhe Baaraamalhaaraanche kathanu | Shrotiyaa saange dhundeenandanu | Narahari Maaloo naama abhidhaanu | Jagaa-maajee mirave toh ||

Ovee 163

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । चतुर्थोध्याय गोड हा ॥ १६३ ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha Kaavya kimayaa gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Chaturtha Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu | Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार चतुर्थाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Chaturtha Sampurnah